



Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७०५ . वा | सोमवार | दि. ११ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये




# लोकसभाकरिता भाईजी ठरू शकतात भाजपसाठी हुकुमाचा एक्का...

## प्रतापरावांबाबत नाराजी, भाजप देखील हक्काच्या उमेदवारीसाठी आग्रही...

**भाग-1**

**जनसंचलन/ बुलढाणा**

शिवसेनेचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या बुलढाणा लोकसभा मतदारसंघात यंदा उमेदवारीसाठी मोठी रस्सीखेच दिसून येत आहे. एकीकडे तीन टर्म खासदार की भोगलेल्या प्रतापराव जाधव यांच्याविरोधात मतदारसंघातील अँटी इन्कम्बन्सी सध्या टोकाला पोहोचली आहे. त्यामुळे काहीही करून यंदा भाजप हा मतदारसंघ आल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र, लोकसभेसाठी लायक ठरू शकेल, अशा उमेदवारांची संख्या भाजपकडे अगदीच बोटावर मोजण्याइतकी आहे. त्यातीलही एक-दोन उमेदवार हे दुसऱ्या पक्षातून आल्यामुळे आता मोदींच्या विकासाच्या चेहऱ्याला साजेसा असा चेहरा द्यावा, अशी मागणी होत आहे. या स्थितीत भाजपसाठी बुलढाणा अर्बनचे सर्वेसर्वा संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उर्फ भाईजी हे हुकमाचा एक्का ठरू शकतात. भाजप-शिवसेनेची युती जेंव्हा अभेद्य होती, त्या वेळी बुलढाणा जिल्ह्यात सातत्याने याच पक्षांचे वर्चस्व राहिलेले आहे. खास करून लोकसभेसाठी हे समीकरण खूपच मजबूत होते. आधी दोन-तीन टर्म शिवसेनेचे आनंदराव अडसूळ व त्यानंतर सलग तीन टर्म प्रतापराव जाधव यांनी खासदरकीचा काळ उपभोगला. परंतु २०१४ च्या विधानसभा निवडणुका आणि त्यानंतर २०१९ नंतर झालेला महाविकास आघाडीचा एकमेवाद्वितीय प्रयोग. हा प्रयोग असा काही पुढे गेला की, त्यातून भाजप-शिवसेनेचा थेट काडीमोडच झाला. त्यानंतर शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झालेली फाटाफुट आणि विद्यमान महायुतीचा झालेला जन्म, या सर्व घडामोडी मतदारांसाठी फारच अनाकलनीय ठरल्या. शिवसेनेच्या फुटीनंतर प्रतापराव जाधव यांनी शिंदे यांच्या गटात उडी घेतली. कमीत कमीत आपली लोकसभेची जागा शाबूत राहील, या उद्देशाने प्रतापरावांचा हा आगळावेगळा प्रवास झाला असेल. मात्र, गेल्या काही दिवसांपासून ज्या काही बातम्या समोर येत आहेत, त्या पाहून कदाचित प्रतापरावांच्याही पोटात गोळा आला असण्याची शक्यता आहे. एकीकडे तीन टर्म खासदारकी घेऊन ही जाधव यांच्या नावावर विकासाचे काही खास प्रताप दिसून येत नाहीत. त्यामुळे जनता त्यांच्यापासून फार खुश दिसून येत नाही. दुसरीकडे शिवसेना फुटल्यापासूनच भाजपला बुलढाणा लोकसभा मतदारसंघ आपल्याकडे खेचून घेण्याची स्वप्ने पडत आहेत. त्यासाठी जिल्ह्यातील भाजप नेते चांगलाच जोर लावत आहेत. काही महिन्यांपूर्वी भाजपचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही राणाभीमादेवी थाटात घोषणा केली होती, तसे भाजपा चे अंतर्गत सर्वेत प्रतापराव जाधव यांना नापसंती मिळाल्याचे बोलल्या जात आहे. बुलढाण्याचा पुढील खासदार हा भाजपचा असेल. बावनकुळेंच्या या वक्तव्यामुळे गेल्या अनेक महिन्यांपासून भाजपचे केंद्रीय मंत्री भुपेंद्र यादव यांची जिल्ह्यात अनेक वेळा येऊन आढावा ही घेतला होता. जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते आपल्याच पक्षाचा एखादा उमेदवार दिला जाईल, या दृष्टीने चातकासारखी वाट पाहत आहेत. या सर्व चर्चांना तेंव्हा आणखी उधाण आले जेंव्हा काही दिवसांपूर्वी जिल्हा भाजपच्या सर्व ग्रुपवर एक मॅसेज फिरतो आहे, जो मॅसेज हे दाखवण्याचा प्रयत्न करतो की, जिल्हा भाजपमध्ये प्रतापरावांविषयी प्रचंड नाराजी असून, आता भाजपचाच उमेदवार या ठिकाणी दिला जाणे आवश्यक आहे. या चर्चेसोबतच या ठिकाणी आणखी एक चर्चा सुरू आहे की, जर मग भाजपचा उमेदवार असेल तर तो कोण असेल आणि किती प्रबळ असेल. किंबहुना तो महाविकास आघाडीच्या उमेदवाराला किती टक्कर देऊ शकेल. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अबकी बार ४०० पार हे स्वप्न पूर्ण करायचे असेल, तसेच जिल्ह्याच्या विकासात मोलाची भर घालायची असेल, तर त्यासाठी एकच लायक नाव चर्चिले जात आहे ते म्हणजे राधेश्याम चांडक उर्फ भाईजी यांचे. चांडक यांच्या कार्याविषयी जिल्ह्यातील नागरिकांना फार काही वेगळे सांगण्याची गरज नाही. बुलढाणा अर्बनच्या माध्यमातून त्यांनी जिल्हाभरात मोठे काम केले आहे. शिवाय त्यांनी आमदारकी-खासदारकी नसतानाही जिल्ह्याच्या विकासात मोठी भर घातली आहे. त्यांनी आज हजारो लोकांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगारही उपलब्ध करून दिला आहे.राधेश्याम चांडक यांची पत्नी पुष्पाताई चांडक बुलढाण्याच्या नगराध्यक्ष असताना त्यांनी शहरात अनेक विकासकामे केली होती. त्यांची विकासाची दृष्टी, कामाची धडाडी आजही कायम आहे. या स्थितीत भाईजी हे भाजपसाठी हुकुमाचा एक्का ठरू शकतात. राजकीयदृष्ट्या राधेश्याम चांडक हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कार्यरत असले, तरी त्यांची विचारधारा ही भाजपशी जास्त जवळीक साधणारी आहे, हे लपून राहिलेले नाही. ते संघ व भाजपच्या व्यासपीठांवर अनेकदा दिसलेले आहेत. त्यांना ओळखणारा प्रत्येक व्यक्तीही हेच सांगेल की, त्यांची विचारधारा एकीकडे हिंदुत्ववादी तर दुसरीकडे विकासवादीही आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाची ही अनोखी खुबी आहे. असा विचार केला तर त्यांचे विचार, त्यांचे व्यक्तिमत्व हे बऱ्याच प्रमाणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी जुळणारे आहे.** नाही म्हणायला जिल्हा भाजपमध्ये काही ना काही गटबाजी ही आहेच. त्यामुळ भाजप पक्षसंघटनेतून जर एखादे नाव समोर आले तर त्याला पक्षातील दुसऱ्या गटाचा विरोध होऊ शकतो. मात्र, राधेश्याम चांडक हे असे नाव आहे, जे संपूर्ण भाजपला चालू शकते. एव्हढेच नाही तर शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्याकडूनही त्यांना अजिबात विरोध होण्याची शक्यता नाही. पर्यायाने या ठिकाणी भाजपचे उमेदवार चांडक असले तर त्यांच्या विजयाची शक्यता त्याहून अधिक आहे. अशा स्थितीत चांडक यांना बुलढाणा लोकसभेचे तिकिट मिळाले तर जिल्ह्याला एक नवा विकासाचा चेहरा प्राप्त होऊ शकतो, यात काही शंका नाही.

**भाईजींची जिल्ह्याच्या विकासा विषयी एकच ख्याती विकासाचा महामेरू**

# ३८ वर्षीय महिलेचा विनयभंग आरोपीविरुध्द गुन्हा दाखल

**जनसंचलन/बुलढाणा**

जलंब एका ३८ वर्षीय विवाहित महिलेचा इसमाने घरात घुसून विनयभंग केला असल्याची घटना ८ मार्च रोजी दुपारी जलंब येथे घडली याप्रकरणी पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार याबाबत वृत्त असे की जलंब येथील एक ३८ वर्षीय विवाहित महिला ही गावामध्ये भागवत सप्ताह ऐकण्यासाठी गेली होती सदर महिला भागवत संपल्यानंतर दुपारच्या सुमारास घरी परत आली असता गा-वातीलच घरासमोर राहात असलेल्या रितेश सुभाष चौधरी या इसमाने महिलेला म्हटले की बाई फराळाचे झाले का -असे म्हणून घरात प्र-वेश केला व म्हणाला की तुझे पती व मुले कुठे गेले आहेत. मी त्याला सांगितले की माझे पती व मुले हे मुक्ताबाई येथे गेले आहेत असे सांगितले असता आरोपी रितेश चौधरी यांने माझा वाईट उद्देशाने माझे हात धरून पलंगावर ओढले व माझा विनयभंग केला तसेच हे जर तू कोणाला सांगितले तर तुला जीवाने मारून टाकेल अशी धमकी सुद्धा आरोपी याने महिलेला दिली. याप्रकरणी घटनेची तक्रार सदर महिलेने जलंब पोस्टेला दिली यावरून पोलिसांनी आरोपी रितेश सुभाष चौधरी यांच्याविरुद्ध अप.न. ६३/२०२४ कलम ४५२, ३५४, ३५४ अ,५०६ भादवी अन्वय गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ठाणेदार अमोल बारापात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेका नन्हेखा तडवी हे करित आहे.

# राष्ट्रमाता जिजाऊ महिला अर्बन शाखा डोंगरखंडाळा भव्य उदघाटन सोहळा दिग्गजांच्या उपस्थितीत संपन्न...



जनसंचलन/बुलढाणा

महाशिवरात्र तथा जागतिक महिला दिनाच्या मुहूर्तावर राष्ट्रमाता जिजाऊ महिला अर्बन च्या दुसऱ्या नवीन डोंगरखंडाळा ता जि बुलडाणा शाखेचा उदघाटन सोहळा कार्यक्रमाचे अध्यक्ष बुलडाणा अर्बनचे सर्वे सर्वा आदरणीय राधेश्याम चांडक भाईजी ,तथा उदघाटक राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते विधानपरिषद आमदार अमोल मिटकरी,बुलडाणा विधानसभेचे विद्यमान आमदार संजय गायकवाड ,विधानपरिषद(पदवीधर )आमदार धीरज लिंगाडे ,चिखली विधानसभेच्यार आमदार श्वेताताई महाले ,माजी आमदार बुलडाणा विधानसभा हर्षवर्धन सपकाळ ,शेतकरी नेते रवीकांत तुपकर ,ऍड.विजय सावळे (अध्यक्ष बार असोशियन बुलडाणा ),शेषराव सावळे (दलितमित्र नेते ),दत्ता काकस (नेते राष्ट्रीय काँग्रेस बुलडाणा ),श्री रामभाऊ बारोटे (अध्यक्ष विवेकानंद पथसंस्था बुलडाणा )यांसोबत अनेक आदरणीय तोलामोलाच्या मान्यवरांच्या आणि गावकरी बंधू भगिनींच्या उपस्थिती मोठ्या उत्साहात पार पडला सूत्रसंचालन आमचे बंधू रणजितसिंग राजपूत यांनी केले विश्वास सहकार्य स्वावलंबन या त्री सुत्रीवर कार्य करत संस्थेने २५ करोड च्या वर आज ठेवी प्राप्त करत ग्राहकांचा विश्वास जपलाय यावेळी मान्यवरांनी संस्थेच्या अध्यक्षा प्रा सौ अनुजा अनिल सावळे तसेच संस्थेचे संचालक मंडळ कर्मचारी यांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.संस्थेच्या अध्यक्षा प्रा सौ अनुजा अनिल सावळे अनेक वर्षांपासून शैक्षणिक ,सामाजिक ,राजकीय क्षेत्रात कार्यरत असून त्यांच्या कार्याचा वेगळा ठसा त्यांनी मोठ्या निपुनपणे उमटवला असून खऱ्या अर्थाने समाजपयोगी महिला ,युवा ,विद्यार्थी ,शेतकरी ,गरजू यांसाठी विविध योजना ,सवलती ,उपक्रम राबवत सहकार जननी माँ जिजाऊंचे विचार आचार कार्य त्या पुढे नेत असून त्यांना सहकाराचं बाळकडू आदरणीय जिल्ह्याचे नेते मार्गदर्शक आमदार डॉ राजेंद्रजी शिंगणे साहेब आणि प्रोत्साहन हे पालकमंत्री तसेच राज्य सहकारमंत्री दिलीपजी वळसे पाटील यांनी संस्थेला दिलेल्या शुभेच्छा भेटीने नक्कीच मिळाले असे कौतुक आमदार अमोलजी मिटकरी यांनी केले. जिल्ह्याचे सहकार तज्ञ् आदरणीय राधेश्यामजी चांडक भाईजी यांनी येणाऱ्या काळात अर्थकारणात पथसंस्था किती आवश्यक भूमिका बजावणार आणि राष्ट्रमाता जिजाऊ महिला अर्बन त्यांच्या अभ्यासू अध्यक्ष आणि त्यांचे यजमान श्री अनिलजी सावळे यांच्या मार्गर्शनात नक्कीच जबाबदार अर्थकारण करतील अशी शाश्वती भाईजींनी दिली . राष्ट्रमाता जिजाऊ महिला अर्बन संस्थेमार्फत नक्कीच आर्थिक बळ गरजुंना मिळेल आणि माझ्या भगिनी संस्थेच्या अध्यक्ष अनुजाताई सावळे ह्यांच्या विश्वास सहकार्य स्वावलंबन या त्री सुत्रीवर नक्क्कीच सहकारात गगनभरारी घेताय असे कौतुक आमदार संजय गायकवाड यांनी केले महिला सबलीकरणाचा ध्यास धरत व्यावसायिक महिला आणि युवा तसेच येणाऱ्या पिढीला आणि शेतकऱ्यांना संस्थेच्या सहकार्यातून बळ मिळेल अशी ग्वाही आणि शुभेच्छा आमदार श्वेताताई महाले यांनी दिल्या . सर्व मान्यवर यांनी व्यस्त वेळेतून उदघाटनास उपस्थिती दर्शवली तसेच मनातून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या याबद्दल खूप आभारी आहे

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार

# सिल्लोडच्या योगेश शेजुळला बुलढाणा पोलिसांनी ठोकल्या बेड्या!



जनसंचलन /बुलडाणा

एका विवाहित नराधमाने लग्नाचे आमिष दाखवून विवाहित महिलेवर अत्याचार केल्याप्रकरणी बुलडाणा शहर पोलिसांनी सिल्लोड तालुक्यातील दीडगाव येथील योगेश शेजुळ विरुद्ध बलात्काराचा गुन्हा ८ मार्च रोजी दाखल केला. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी योगेश शेजुळ याला ८ मार्चच्याच रात्री उशिरा त्याच्या राहत्या घरातून पोलिसांनी उचलले. व त्याला अटक करण्यात आली. पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, घटनाक्रम १० मे २०२३ ते ११ नोव्हेंबर २०२३ यादरम्यान घडलेला आहे. मैत्रिणीच्या माध्यमातून योगेश आणि पिडीतेची ओळख झाली काही काळाने ओळखीचे मैत्रीत रूपांतर झाले. योगेश आधीपासूनच विवाहित होता. तर पीडिता ही पतीपासून विभक्त राहते असे. तिचे वय ४२ वर्ष असून तिला १२ वर्षाचा मुलगा देखील आहे. तरी सुद्धा योगेशने तिला लग्नाचे आमिष दाखवून आपण पत्नीपासून घटस्फोट घेतला असल्याचे बनावट कारण सांगितले. त्यानंतर त्याने पिडीतेच्या घरी येऊन घरात कोणी नसताना तिच्यावर बलात्कार केला. अशी माहिती पीडितेने तिच्या मैत्रिणीला दिली. त्यानंतर तिला योगेश शेजुळ याच्या घरी दिडगाव येथे नेण्यात आले. त्यावेळी घरातच माळा टाकून दोघांनी लग्न केले. परंतु लग्नाची नोंद नंतर करू असे पिडीतेला सांगण्यात आले होते. परत योगेश शेजुळेने पिडीतेशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. मात्र जेव्हा पीडितेने आपल्या लग्नाबाबत विचारणा केली. तेव्हा तिला बेदम मारहाण करून घरातून हाकलून देण्यात आले. असे पीडितेने तक्रार अर्जात म्हटले आहे. अशा पद्धतीने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच काल ८ मार्च रोजी पिडीतेने बुलडाणा शहर पोलीस ठाण्यात धाव घेत योगेश किसनराव शेजुळ याच्या विरोधात तक्रार दिली. पोलिसांनी त्याच्या विरोधात बलात्कारासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. तपास चक्र फिरले आणि रात्रीचं बुलढाणा पोलिसांनी नराधम योगेशला सिल्लोड तालुक्यातील दडीगाव येथून ताब्यात घेतले. याप्रकरणाचा पुढील तपास एपीआय प्रियंका गोरे करत आहेत.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ७.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.५०% | ७.५०% |
| ३ | १८१ दिवस ते १६ महिने | | ८.००% | ८.००% |
| ४ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ७.००% |
| ५ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ६ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |
| ७ | सुकन्या लक्षाधिश ठेव योजना | | ८.७०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर ०.२५% टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सोनाळा संत्री हा जागतिक ब्रँड बनवणार- सुनील शेळके...

## अभिता ॲग्रो इंडस्ट्रीजच्या संत्रा प्रक्रिया उद्योगाचा शुभारंभ

जनसंचलन / सोनाळा

सोनाळा, संग्रामपूर परिसर संत्रा बेल्ट म्हणून ओळखला जातो. संत्र्यामुळे इथल्या शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक सुबत्ता आली आहे. शेतकऱ्यांची बऱ्याच वर्षांपासूनची मागणी लक्षात घेऊन येथे संत्रा प्रक्रिया उद्योग सुरु केला आहे. भविष्यात सोनाळा संत्री हा जागतिक ब्रँड बनवू, असे प्रतिपादन अभिता ॲग्रो इंडस्ट्रीजचे संस्थापक आणि सीईओ सुनील शेळके यांनी केले. अभिता ॲग्रो इंडस्ट्रीजच्या माध्यमातून जिल्ह्यातील पहिल्या संत्रा प्रक्रिया उद्योगाचा शुभारंभ १० मार्च रोजी सकाळी त्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राजर्षी शाहू परिवाराचे संस्थापक भाऊसाहेब शेळके होते. मंचावर दिशा बुलढाणा जिल्हा महिला बचतगट फेडरेशनच्या संस्थापक अध्यक्षा जयश्रीताई शेळके, शिवसेना (उबाठा) गटाचे सहसंपर्क प्रमुख दत्ता पाटील, काँग्रेसच्या प्रदेश सचिव स्वातीताई वाकेकर, जि. प. माजी अध्यक्ष प्रकाश पाटील, प्रदेशाध्यक्ष महिला ओबीसी आघाडी प्रदेशाध्यक्षा ज्योतीताई ढोकणे, माजी जि. प. उपाध्यक्ष संगीतराव भोंगळ,माजी जि. प. सदस्य प्रमोद खोद्रे, शिवसेना (उबाठा) जळगाव जामोद तालुका अध्यक्ष गजानन वाघ, संग्रामपूर तालुका अध्यक्ष रविंद्र झाडोकार, काँग्रेसचे संग्रामपूर तालुकाध्यक्ष राजेंद्र वानखेडे, जळगाव जामोद तालुका अध्यक्ष अविनाश उमरकर सरपंच हर्षल खंडेलवाल, प्रकाशबापू देशमुख, जि. प.सदस्य गजानन काकड, शामशील भोपळे, डॉ.प्रमोद अरबट, अताउल्ला पठाण सर, नक्कलसिंग भाटीया, समाधान दामधर, जाहीर आली, एम. डी. साबीर, संतोष मेढे, भीमराव पाटील, सुनील सोळंकी, गणेशराव रिंढे, अर्चनाताई शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी महानायिकांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी संत्र्याचा हार घालून सुनील शेळके यांचा सत्कार केला. इतर प्रमुख मान्यवरांचे सुद्धा पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते सोनाळा संत्री या ब्रँडचे लोकार्पण झाले. पुढे बोलतांना सुनील शेळके म्हणाले, पारंपरिक शेती आता परवडणारी नाही. काळानुरूप शेतीला तंत्रज्ञानाची जोड देणे गरजेचे आहे. शेतीपूरक व्यवसाय म्हणून शेतकऱ्यांनी दुग्ध व्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, फळशेती, फुलशेतीची कास धरावी. आपण जे पिकवतो त्याचे मार्केटिंग करता आले पाहिजे. सोनाळा, संग्रामपूर परिसर संत्र्यासाठी प्रसिद्ध आहे. शेतकरी संत्र्याचे मुबलक उत्पादन घेतात. मात्र या भागात संत्रा प्रक्रिया उद्योग नव्हता. ही बाब लक्षात घेऊन अभिता ॲग्रो इंडस्ट्रीजने संत्रा प्रक्रिया उद्योग सुरु केला आहे. भविष्यात याठिकाणी संत्रा प्रक्रियेचे आणखी इतर उद्योग सुरु करण्यात येणार आहेत. यावेळी बोलतांना जयश्रीताई शेळके म्हणाल्या की, दिशा बुलढाणा जिल्हा महिला बचतगट फेडरेशनच्या माध्यमातून जिल्ह्यात आर्थिक चळवळ काम करीत आहे. स्वतःचा उद्योग सुरु



करून अनेक महिलांनी उन्नती साधली आहे. सोनाळा, संग्रामपूर संत्रा उत्पादकांचा परिसर म्हणून परिचित आहे. अभिता कंपनीने सुरु केलेल्या संत्रा प्रक्रिया उद्योगामुळे स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना लाभ होणार आहे, ही बाब मनाला समाधान देणारी असल्याचे जयश्रीताई शेळके म्हणाल्या. सोनाळा परिसरात संत्रा प्रक्रिया उद्योग सुरु करुन अभिता ॲग्रो इंडस्ट्रीजने शेतकऱ्यांच्या कल्याणाचे कार्य केल्याचे संगीतराव भोंगळ म्हणाले. दत्ता पाटील म्हणाले की, संत्रा प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून सोनाळ्याचे नाव देशभरात पोहचणार असून सुनील शेळके, जयश्रीताई शेळके यांच्या दूरदृष्टीचे त्यांनी कौतुक केले. सोनाळा येथे सुरु झालेला महत्वाकांक्षी संत्रा प्रक्रिया उद्योग शेतकऱ्यांना उन्नतीचा मार्ग दाखवेल, अशी आशा प्रकाश अवचार यांनी व्यक्त केली. संत्रा प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनात गोडवा येईल, असा विश्वास ज्योतीताई ढोकणे यांनी व्यक्त केला. स्वातीताई वाकेकर यांनी शेळके दाम्पत्याच्या विकासाच्या व्हीजनचे कौतुक केले. कार्यक्रमाचे संचलन स्वप्नील देशमुख यांनी केले तर आभार मनोज वाघ यांनी मानले.

# जिल्ह्यात गुंतवणूकीसाठी उद्योजकांनी पुढाकार घ्यावा-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन /बुलडाणा

जिल्ह्यात उद्योगधंद्यांमध्ये गुंतवणूक करण्यास पूरक वातावरण आहे. तसेच जिल्ह्यात असलेल्या पायाभूत सुविधांमुळे उद्योगांना चालना मिळणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील औद्योगिक विकासासाठी उद्योजकांनी गुंतवणूक करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना देणे, गुंतवणूक वाढवावी, तसेच नवनवीन उद्योग व्यवसाय जिल्ह्यामध्ये येऊन त्याद्वारे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती व्हावी, यासाठी मंगळवार, दि. १२ मार्च रोजी रेसिडेन्सी क्लब येथे गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाद्वारे या परिषदेच्या माध्यमातून इच्छुक गुंतवणूकदारांसमवेत सामंजस्य करार करण्यात येणार आहे. यासाठी गुंतवणूकदारांना आवश्यक सोयी सुविधा आणि परवानगीसाठी सिंगल विंडो सिस्टीम उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या माध्यमातून सर्व प्रकारच्या मान्यता एकाच ठिकाणी, एकाच वेळेला, एकाच टप्प्यामध्ये सुलभ पद्धतीने देण्याचे नियोजन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. जिल्हा हा नैसर्गिकदृष्ट्या समृद्ध आहे. याठिकाणी मोठ्या प्रमाणात शेती व्यवसाय आहे. त्यामुळे या ठिकाणी कृषीमालावर प्रक्रिया, तसेच जिल्ह्यात दैनंदिन जीवनात आवश्यक असणाऱ्या वस्तू उद्योगाला वाव आहे. जिल्ह्यात केमिकल उद्योग आहे. या उद्योगातही विकासाला संधी आहे. जिल्ह्यात पायाभूत सुविधा निर्माण झाल्या असून जिल्ह्यामधून समृद्धी महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग, औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचे औरंगाबाद, जालना, अकोला ही शहरे जवळ आहे. अशा या भौगोलिकदृष्ट्या महत्वपूर्ण ठिकाणी असलेल्या जिल्ह्यामध्ये इच्छुक गुंतवणूकदारांनी गुंतवणूक करण्यासाठी पुढे यावे. त्यांना संपूर्ण सहकार्य करण्यात येईल. उद्योग सुरू करण्यासाठी अन्य ठिकाणी जागेचा शोध घेत असलेल्या उद्योजकांनी जिल्ह्यात गुंतवणूक करावी. त्यांना जागा उपलब्ध आणि सर्व विविध परवानगी देण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. गुंतवणूकदारांनी या जिल्हा गुंतवणूक परिषदेकरीता उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.

# चिखली ते बुलढाणा रोडवरील पडलेले मोठे खड्डे त्वरित बुजवा युवासेनेचे जिल्हाध्यक्ष यांची मागणी

## मागणी मान्य न झाल्यास टोल वसुलीसह टोलनाका ही बंद करण्याचा दिला इशारा

जनसंचलन /बुलडाणा

बुलढाणा ते चिखली २४ किलोमिटर मध्ये काही ठिकाणी रस्त्याची अत्यंत वाईट अवस्था झाली असून चिखली बुलडाणा हा महत्वाचा रस्ता असून रोडवरती मोठे खड्डे पडले आहेत, रस्त्यावरती काटेरी झुडपे आहे, साईड खालीवर आहे भरलेल्या नाही अश्या महत्वाच्या रस्त्याची दुरअवस्था असल्याने अनेक अपघात रस्त्यावरती झाले आहे. या रस्त्याच्या नविनीकरणाचे काम तातडीने करावे अन्यथा तीव्र आंदोलन पुकारण्यात येईल असा इशारा युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष नंदूभाऊ कऱ्हाडे यांच्या वतीने देण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम उपवभागीय अभियंता राजेश एकडे साहेब यांना निवेदन दिले आहे निवेदनात नमूद आहे की,चिखली ते बुलढाणा हा २४ किमीचा रस्ता काही ठिकाणी अतिशय खराब झालेला आहे. हा रस्ता ठिकठिकाणी उखडला गेला असून ग्रामस्थांना या रस्त्यावरुन प्रवास करणे सुध्दा कठीण झाले आहे. सदर रस्त्याचे काम गेल्या कित्येक वर्षापासून



करण्यात आले नाही. त्यामुळे या रस्त्यावर अवलंबून असलेल्या चिखली, व बुलढाणा शहरांसह आजुबाजुच्या गावातील ग्रामस्थांना अनेक त्रासाचा सामना करावा लागत आहे. खराब रस्त्यामुळे अनेक अपघात होवून ग्रामस्थ जखमी झाले आहेत. आपातकालीन परिस्थितीत या रस्त्यावरून रुग्णांना तालुक्याच्या ठिकाणी नेतांना नातेवाईकांना अनेक हालअपेष्टांचा सामना करावा लागत आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ग्रामस्थांनी दिलेल्या अनेक निव्ेदनावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. तरी या रस्त्याचे काम लवकर मार्गी लावले नाही तर रस्त्यावर सुरू असलेला टोल वसुली बंद करून टोल बंद पाडण्यात येईल असा इशारा सुद्धा देण्यात आला आहे.

# बुलडाणा येथे मंगळवारी जिल्हा गुंतवणूकदार परिषद

## गुंतवणूकदारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन...

जनसंचलन /बुलडाणा

उद्योग संचालनालय आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने बुलडाणा जिल्हा गुंतवणूकदार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. १२ मार्च २०२४ रोजी सकाळी १० वाजता बुलडाणा अर्बन रेसिडेन्सी क्लबच्या न्यू हॉल येथे ही परिषद होणार आहे. जिल्ह्यात विविध क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करणे, विकासाला चालना देणे आणि राज्यातील जिल्ह्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी ही परिषद घेण्यात येत आहे. पालकमंत्री दिलीप वळसे पाटील यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहतील. तसेच खासदार प्रतापराव जाधव, रक्षा खडसे, आमदार किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, धीरज लिंगाडे, डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ. संजय कुटे, संजय रायमुलकर, ॲड. आकाश फुंडकर, संजय गायकवाड, श्वेता महाले, राजेश एकाडे यांच्यासह उद्योग विकास आयुक्त, मैत्रीचे अध्यक्ष आणि निर्यात आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील उपस्थित राहतील. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील



गुंतवणूकदारांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अमरावती विभागाचे उद्योग सहसंचालक गजेंद्र भारती, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी दिगंबर पारधी, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सुनील पाटील यांनी केले आहे.

# युवा उद्योजक डॉ.अर्चित हिरोळे यांना मुकनायक बुलढाणा पुरस्कार प्रदान...

जनसंचलन /बुलढाणा

उद्योजक व समाजसेवी असलेले डॉ. अर्चित अमोल हिरोळे यांना , शहरात ९ मार्च रोजी झालेल्या जागतिक स्तरावरील धम्म परिषद आणि बिझनेस एक्स्पो च्या पावन सोहळ्यात मुकनायक बुलढाणा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. उद्योग क्षेत्रअंतर्गत डॉ. अर्चित हिरोळे यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बद्दल सदर पुरस्कार देण्यात येत आहे. बुलढाणा जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रात आपला अप्रतिम ठसा उमटविलेले माजी शिक्षणाधिकारी स्व. नामदेवराव हरिभाऊ हिरोळे यांचे नातू व नामांकित उद्योजक अमोल नामदेवराव हिरोळे यांचे ते चिरंजीव आहे. मितभाषी व शांत स्वभावाचे असलेले डॉ. अर्चित अमोल हिरोळे हे राष्ट्रीय एकात्मतेची प्रतीक बुध्दविहार गारडगाव या संस्थेचे उपाध्यक्ष आहेत औरंगाबाद येथून एमजीएम या वैद्यकीय विद्यालयातून त्यांनी वैद्यकिय शिक्षण प्राप्त केलेले आहे. डॉ. अर्चित अमोल हिरोळे यांचे बुलढाणा येथे जयस्तंभ चौकात हिरोळे पेट्रेलियम पेट्रोल पंप असून हिरोळे ईण्डेन गॅस एजन्सीच्या माध्यमातून ते बुलढाणा शहरात पेट्रोल डिझेल व गॅस ची निरंतर निर्विवाद सेवा पुरवीत असतात. तसेच समृद्धी




महामार्गावरील मांडावा ता. लोणार येथे त्यांचा दुसरा पेट्रोल पंप आहे आपल्या या व्यवसायाचा माध्यमातून त्यांनी सर्वच समाजातील कित्येक युवांना रोजगार दिला असून जवळपास दीडशे कुटुंबाचे भरणपोषण आज त्यांच्या माध्यमातून होत आहे. कोविड च्या काळात त्यांनी कित्येक गरजू कुटुंबाना स्वतः अन्न पुरवठा घरोघरी जाऊन केला आहे याकाळात अनेक गरजू कुटुंबाना आर्थिक व वैद्यकीय मदत केलेली आहे. गरजू गरीब कुटुंब असलेल्या भागात वैद्यकीय सेवा देत असतांना ते स्वतः सुद्धा कोविड ग्रस्त झाले होते परंतु या तुन सावरून व कोविड वर मात करून परत आपली सेवा देऊन त्यांनी आपले सामाजिक कर्तव्य न डगमगता पार पाडले. कोविड च्या काळात बेवारस मृतदेहांना अंतिम संस्कार करण्यापासून ते कोविडच्या काळात मृत झालेल्या सर्व मृतदेहांना अंतिम संस्कार करण्याकरिता मोफत डिझेल पुरवठा केलेला आहे. ते आपल्या सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर राहत असून अनेक गरजूना आर्थिक व सामाजिक मदत करीत असतात बुलढाणा शहरात होणाऱ्या सर्वच सामाजिक उपक्रमात से हिरानीने सहभागी होत असतात. अश्या उदयोग क्षेत्रात व सामाजिक क्षेत्रात ठसा उमटविलेल्या व्यक्तीस मुकनायक बुलढाणा पुरस्कार जाहीर होणे म्हणजे त्यांच्या उदयोग क्षेत्रात व सामाजिक क्षेत्रात केलेल्या कामाची पावतीच आहे.अंतरराष्ट्रीय स्तराचे धम्मगुरु, बौद्ध समाजातील गणमान्य आणि अनेक प्रतिष्ठीतांच्या उपस्थितीत त्यांना मूकनायक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# खुमगाव येथे शेतकऱ्याची आत्महत्या...

जनसंचलन / नांदुरा

तालुक्यातील खुमगाव येथे एक कर्जबाजारी शेतकऱ्याने रेल्वेगाडीच्या इंजिनसमोर येऊन आत्महत्या केल्याची घटना ९ मार्च रोजी उघडकीस आली. खुमगाव बुर्ती स्टेशन मास्टर यांनी शेगाव येथील लोहमार्ग पोलिस अंमलदार गजानन मेटांगे यांना आत्महत्येची माहिती दिली. मुकेश शंकरराव काळे (४६) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. कर्जबाजारीपणामुळे त्यांनी आत्महत्या केल्याचे नातेवाइकांनी सांगितले. मृतदेह शवविच्छेदनाकरिता रुग्णवाहिकेने सरकारी दवाखाना नांदुरा येथे आणण्यात आला. मुकेश हा घरातील कर्ता पुरुष असून, त्यांच्यामागे पत्नी, दोन मुली व एक मुलगा असा परिवार आहे. मुकेश शेतकरी असून, कर्जबाजारी होता. त्याच नैराश्यातून त्याने जीवन संपविल्याचे नातेवाइकांनी सांगितले. पुढील तपास लोहमार्ग पोलिस स्टेशनचे पोलिस अंमलदार पांडुरंग वसू करीत आहे. कारवाईदरम्यान हवालदार झनके, खुमगाव येथील माजी सरपंच रोहित सोनोने, गजानन वावगे, किशोर गई, बाबूराव काळे यांनी मदत केली.

# बचत गटातील महिलांना कर्जवाटप


जनसंचलन / धामणगाव बढे

शासनाच्या धोरणानुसार महिला सक्षमीकरण हे भारतीय स्टेट बँकेचे उद्दिष्ट असून, मिळणाऱ्या अर्थसहाय्यातून महिलांनी विकास साधावा, असे प्रतिपादन स्टेट बँकेचे जिल्हा प्रबंधक मो. इकबाल हुसेन यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त धामणगाव बढे स्टेट बँक शाखेतर्फे परिसरातील पाच महिला बचत गटांतील ५० महिलांना १२ लाखांचे अर्थसहाय्य व्याजदराच्या अत्यल्प कर्जरूपात करण्यात आले. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रास्ताविक शाखा प्रबंधक वैभव जवंजाळ यांनी केले. यावेळी त्यांनी बँकेच्या विविध योजनांविषयी विस्तृत माहिती दिली. महिला दिनानिमित्त बचत गटाच्या महिलांना मोफत दोन लाखांचा विमा प्रदान करण्यात आला. यावेळी प्रामुख्याने व्यावसायिक प्रतिनिधी सुरेश हुडेकर, राजेश मोदे, एकनाथ किन्होळकर, सोनू बंगळे, सतीश दराखे, भागवत किन्होळकर, अजित मोदे, रमेश हुडेकर, संतोष साखळीकर उपस्थित होते. राहुल चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तसेच उपस्थितांचे आभार मानले.

# शेंबा येथील एटीएम फोडले १३ लाखाचा मुद्देमाल लंपास...

जनसंचलन/ खामगाव

मोताळा नांदुरा तालुक्यातील शेंबा येथील बँक ऑफ महाराष्ट्र बँकेचे एटीएम फोडून त्यातील १३ लक्ष २२ हजाराची रोख लंपास केल्याची घटना १० मार्च रोजी सकाळी उघडकीस आल्याने एकच खळबळ उडाली. चोरट्यांनी सिसिटीव्ही मशीनवर काळा स्प्रे मारून मिशन फत्ते केले आहे. चोरटे चोरी कशाप्रकारे करतील याचा नेम राहिला नाही. चोरट्यानी आपले नेटवर्क सक्रीय करीत आपला मोर्चा नांदुरा तालुक्यातील शेंबा येथील बँक ऑफ महाराष्ट्र बँकेच्या एटीएमवर चोरट्यांची चोरी करण्याची पध्दत वेगळीच होती. त्यांनी प्रथम एटीएम मशीनमध्ये प्रवेश करून रूमधील सिसिटीव्ही कॅमेऱ्यावर काळा रंगाचा स्प्रे मारून एटीएम मशीनचा दरवाजा ग्यास कटरने कापून एटीएम मधील रक्कम लुटून नेली. चोरटे काळ्या गाडीतून आल्याचे सीसीटीव्हीत कैद झाले आहे. बँक मॅनेजर पवनकुमार कुरील यांच्या फिर्यादवरून बोराखेडी पोलिसांनी




दोन अनोळखी चोरट्यांवर भांदवीचे कलम ४६१, ३८०, ४२७, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# १३ वर्षीय मुलीचा विनयभंग; युवकावर गुन्हा...

जनसंचलन/ खामगाव

घरात भांडे घासत असलेल्या १३ वर्षीय मुलीला युवकाने पाणी मागत वाईट बोलुन तिचा विनयभंग केल्याची घटना तालुक्यातील अडेगाव येथे घडली. येथील पीडीत मलगी शक्रवारी घरात भांडे घासत हौती. यावेळी पुरुषोत्तम श्रीराम बहुरुपी (३८) रा. बोरीअडगाव याने तिला पिण्यासाठी पाणी मागितले व वाईट उद्देशाने हात पकडून ५०० रु. देण्याचे. आमीष दाखवून वाईट बोलत तिचा विनयभंग केला. याबाबत पीडित मुलीच्या आईने खामगाव ग्रामीण पोस्टेला तक्रार दिली असून त्यावरुन पोलिसांनी पुरुषोत्तम श्रीराम बहुरूपी याच्याविरुध्द कलम ३५४, ३५४(अ) भादंवीनुसार सहकलम पोस्कोनुसार गुन्हा दाखल केला आहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958